


आम्ही खरंच स्वतंत्र झालो?

मनोजकुमार

मनोजकुमारला 'भारत' हे नाव का आवडतं? त्याने साकारलेल्या बऱ्याच व्यक्तिरेखा देशप्रेमाचा पुरस्कार करणाऱ्या होत्या. ही देशभक्तीची बिजं त्याच्या मनात रूजली कधी आणि अंकुरली कशी?

□ राघव शास्त्री



उपकार चित्रपटात आशा पारेखसह

देशभक्ती माझ्या मनात नेमकी कधी आणि कशी रुजली हे आता सांगणं तसं कठीण आहे. लाहोरला आमचं घर होतं. खूप श्रीमंत नाही तरी सधन परिवारात माझा जन्म झाला. स्वत:ची हवेली होती. वडिलांचा वडिलोपार्जित व्यवसायात जम बसला होता. बालपणाच्या त्या रम्य आठवणी एका काळ्याकुट्ट रात्रीने कटू केल्या.

फाळणी झाली आणि आम्ही जेमतेम जीव वाचवून रेफ्युजी कॉलनी, दिल्लीला पोहोचलो. तिथे तीन प्रकारचे कॅम्प होते. आम्ही हसेल लाईन कॅम्पमध्ये होतो. शहरापासून दूर. गहू दळायचे, दूध-भाजीपाला आणायचा तर दोन मैलांचा रस्ता पायी तुडवत जावं लागायचं. तो संपूर्ण जंगलाचा परिसर होता. तेव्हा मी फार तर नऊ वर्षांचा असेन.

माझी आई आजारी होती. तिला तीस हजारी हॉस्पिटलला दाखल केलं. धाकटा भाऊ दोन वर्षांचा होता. तोही खूप आजारी. औषधांची दुकानं बरेचदा बंदच असायची. हॉस्पिटलमध्ये ना औषधांची सोय होती ना डॉक्टर-नर्सेसचा पत्ता असायचा. अशा परिस्थितीत धाकटा भाऊ गेला. मुलाच्या निधनाने खचलेले वडील त्याही मन:स्थितीत आपल्या आई-वडिलांचा शोध घेत होते. आणि त्यांना समजलं की लाहोरच्या कोहदरा गावात त्यांची हत्या करण्यात आली. भिंतीवर डोकं आपटून विलाप करणाऱ्या वडिलांची प्रतिमा मी कधीच विसरू शकणार नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी वडिलांनी मला हलवून जागं केलं. म्हणाले, 'चल, लाल किल्ल्यावर जाऊ.' काल आपल्या माणसांच्या मृत्यूमुळे व्यथित झालेले वडील आज लाल किल्ल्याला कशासाठी जातायत असा विचार मी करत होतो. पण वडिलांनी मला जवळजवळ ओढतच आपल्याबरोबर नेलं. तीन तासांच्या प्रवासानंतर आम्ही लाल किल्ल्यावर पोहोचलो. पं. जवाहरलाल नेहरू लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावत होते. हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाने त्या झेंड्याला 'जय हिंद'ची मानवंदना दिली. तीन वेळा 'जय हिंद' म्हणून वडिलांनीही आपल्या स्वतंत्र देशाच्या त्या प्रतीकाला सॅल्यूट केला. मी पुन्हा बुचकळ्यात पडलो. काल रात्री आक्रोश करणारा हा माणूस आज देश स्वतंत्र झाल्याच्या आनंदात आपलं दु:ख विसरून गेला?

तीन तासांच्या प्रवासाने मला खूप तहान लागली होती. मी एका माणसाकडून तीन-चार ग्लास पाणी घेऊन घटाघटा प्यायलो. त्याने त्याचे पैसे मागितल्यावर मला आश्चर्य वाटलं. लाहोरला आमच्याकडे एखादा सण समारंभ असायचा तेव्हा येणाऱ्या-जाणाऱ्यांनाही आम्ही बदामाचं सरबत पाजायचे. आणि स्[illegible] पाण्यासाठीही पैसे मोजावे लागणार? यावर वडील म्हणाले, 'बेटा, देशाच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही अगोदरच खूप काही गमावलं आहे. या अनुभवातून तुला काय शिकायला मिळालं ते महत्त्वाचं आहे.' त्यांच्या शब्दांचा नीटसा अर्थ मला कळला नाही. पण स्वातंत्र्य मिळालं ही मोठी आनंदाची गोष्ट आहे इतकंच समजलं. वडिलांनी मग स्वखर्चाने मिठाई खरेदी करून रेफ्युजी कॅम्पमध्ये वाटली. या घटनेतून माझ्या मनात देशभक्तीचं बीज रुजलं.

देशभक्तीच्या आडून मनोजकुमारने पैसा केला असा आरोप नेहमी केला जातो. पण पैसा कोणाला नको असतो. पोटाची खळगी भरायला पैसा पाहिजेच. १९५६ साली मी दिल्लीहून मुंबईला आलो तेव्हा माझ्यासमोर दोनच ध्येयं होती. हिरो बनायचं आणि तीन लाख रुपये कमवायचं. त्यातले एक लाख रुपये आई-वडिलांसाठी आणि एक लाख भावंडांसाठी. पण हिरो बनल्यानंतर मी पैसे मोजणं बंद केलं. कारण निव्वळ पैसा कमावणं हा माझा हेतू राहिलाच नव्हता.

अभिनेत्याचं लग्न झालं की त्याला काम मिळणं बंद होतं असाही एक समज तेव्हा इंडस्ट्रीत दृढ होता. पण आपल्या धर्मानुसार पंचविसाव्या वर्षापर्यंत लग्न झालंच पाहिजे असे संस्कार झाल्यामुळे मी तेही केलं. मला लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. त्यातही इतिहास हा माझा आवडता विषय. आत्मचरित्रांचं वाचन करणं हाही माझा छंद होता.

सुरुवातीला अभिनेता म्हणून बराच संघर्ष करावा लागला. त्यावेळी पोटापाण्याची सोय म्हणून मी घोस्ट रायटिंग सुरू केलं. दिवसाचे अकरा रुपये मिळायचे. त्यातच मी गुजराण करत होतो. मला एखादा रोल द्या असं ज्याला त्याला सांगायचो. शेवटी मोठ्या मुश्किलीने १९५७ मध्ये *फॅशन* चित्रपटात ६३ वर्षांच्या भिकाऱ्याची एक छोटी भूमिका मला मिळाली. इथून माझ्या कारकिर्दीला सुरुवात झाली. तेव्हा माझं वय होतं फक्त एकोणीस वर्ष. चित्रपटाचे मुख्य





शास्त्रीजींच्या आशीर्वादाने भारतपुत्राच्या कारकीर्दीला सुरुवात


कलाकार होते प्रदीपकुमार-माला सिन्हा. नंतर बराच काळ मी संघर्ष करत होतो.

पुढे मी हिरो झालोदेखील. पण माझ्या मनात नेहमीच देशभक्ती, स्वातंत्र्यसैनिक, क्रांती याचेच विचार रुंजी घालत. पंडित प्रदीप यांचं 'दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल...' या गाण्याशी मी अजिबात सहमत नव्हतो. कारण स्वातंत्र्यसैनिकांवर इंग्रजांनी केलेले अनन्वित अत्याचार, फाळणीनंतर झालेला रक्तपात मी माझ्या डोळ्यांनी पाहिला होता. मंगल पांडे, भगत सिंग, राजगुरू, सुखदेव, राजेंद्र लहरी, राम प्रसाद बिस्मिल, असफाक उल्ला खां, चंद्रशेखर आजाद अशा शेकडो स्वातंत्र्यसैनिकांनी या भूमीसाठी आपल्या प्राणांचं बलिदान दिलं. पण त्यांचं बलिदान दडपून टाकण्यात आलं. या देशावर स्वतःच्या प्राणांपलीकडे प्रेम करणारे सुभाषचंद्र बोस त्यांना काँग्रेसने देशत्याग करण्यास भाग पाडलं.

या सगळ्या गोष्टींमुळे मी मनातून अस्वस्थ होतो. मी या क्रांतिवीरांवर एक कथानक लिहिलं. त्यावेळी आमचे एक स्नेही पी. कश्यप यांच्याकडे मी राहात होतो. ते स्वतः एक प्रचारक म्हणून काम करत होते. त्यांना मी माझी कथा ऐकवली. त्यांना ती खूप आवडली. इतकी, की ते लगेच मला म्हणाले, 'या कथेवर मी एक चित्रपट काढतो.' मी त्यांना सांगितलं की, हा चित्रपटाचा विषय नाही. लोकांना ...ँटिक विषयावर चित्रपट हवे असतात. पण ते काहीएक ऐकायला तयार नव्हते आणि मग एस. राम शर्मांच्या दिग्दर्शनात चित्रपट बनला. त्यावेळी लाल बहादूर शास्त्रींच्या घरी माझं जाणं-येणं असायचं. त्यांनी दहा मिनिटं तरी माझा चित्रपट पाहावा अशी मी त्यांना विनंती केली. माझ्या विनंतीनुसार शास्त्रीजी आले. पण चित्रपट पाहायला बसले ते संपेपर्यंत. चित्रपट पाहताना त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. चित्रपट संपल्यावर उत्स्फूर्तपणे त्यांनी टाळ्या वाजवल्या. रात्री दोन-अडीच वाजता त्यांचा फोन आला, 'तुम्ही आम्हाला बालपणात नेलंत. खूप छान चित्रपट काढला आहे. सगळ्या युनिटसह तुम्ही माझ्या घरी भोजनाला या.' त्यांच्या आग्रहास्तव आम्ही त्यांच्या घरी गेलो. शास्त्रीजी म्हणाले, 'मी जवान नाही आणि किसान (शेतकरी) ही नाही. तरी पण तुम्ही 'जय जवान जय किसान'वर आधारित एक चित्रपट बनवा.' यावर मी प्रयत्न करतो असं उत्तर देऊन त्यांचा निरोप घेतला आणि मुंबईला परतलो. सबंध प्रवासात मी शास्त्रीजींच्या प्रस्तावाचाच विचार करत होतो आणि माझ्या डोक्यात एक कथानक आकारलं. *उपकार* चित्रपटाचं लोकांनी किती स्वागत केलं हे मी सांगायला नको. वाईट एकाच गोष्टीचं वाटतं, हा चित्रपट पाहायला शास्त्रीजी राहिले नाहीत.



अभिनेता म्हणून बराच संघर्ष केला.



देशभक्तीपर चित्रपटांत मानबिंदू ठरलेल्या *उपकार*मध्ये



...आणि देशभक्तीची मशाल पेटली.

आज आपण स्वातंत्र्याचं अर्ध शतक पार केल्यानंतरही स्वतःला विचारतो, आपण खरंच स्वतंत्र झालोय का? १९४७ मध्ये आम्ही या भूमीचा एक हिस्सा गमावला. आज प्रत्येक प्रांत स्वतःच्या भाषेबाबत आग्रही दिसतो. चार हिंदुस्तानी एकत्र आले तर एका भाषेत बोलू शकत नाहीत. मी जेव्हा *शहीद* बनवत होतो तेव्हा आमच्या एका स्नेह्यांच्या घरी - प्रेम धवन यांच्या घरी - तत्कालीन संरक्षणमंत्री कृष्ण मेनन आले होते. तिथे मोहम्मद रफीही हजर होते. रफी साहेबांना सफाईदार इंग्रजी बोलता येत नव्हतं तर मेनन साहेबांना हिंदी येत नव्हतं. या दोन मऽहाऽन हस्तींच्या संभाषणात मी दुभाषी म्हणून काम केलं. आता ज्या देशात एकच भाषा बोलली जात नाही त्या देशातील लोकांना ऐक्याच्या धाग्याने एकत्र कसं आणायचं?

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मी अशा अनेक घटना अनुभवल्या. म्हणूनच चित्रपटासाठी लेखन वा निर्मितीचा विचार केला तेव्हा मी या गोष्टींना अधिक महत्त्व दिलं. *उपकार*नंतर *पूरब पश्चिम*, *शोर*, *रोटी कपडा और मकान*, *क्रांती*, *क्लर्क*, *कलियुग की रामायण*, *जयहिंद द प्राइड* असे देशभक्तीचा संदेश देणारे चित्रपट बनवले. ते बनवताना लोकांच्या आवडीला दुय्यम मानलं असं कधीच झालं नाही.

१९६३-६४ च्या दरम्यान मी पहिल्यांदा वाजपेयींचं भाषण ऐकलं. त्यांच्या शब्दांत मला देशभक्ताची कळकळ जाणवली. आणि मी मनोमन त्यांना स्वतःचा शिष्य मानू लागलो. नंतर आम्ही बरेचदा भेटलो. ते पंतप्रधान झाल्यानंतर भेटीचा योग आला नाही. पण आज इतक्या माणसांच्या, प्रवृत्तींच्या गराड्यात राहूनही ते या देशाच्या प्रगतीसाठी झटतायत ते पाहून त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. ●